17 JAN 2018 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : विद्यार्थी संवाद कार्यक्रमात सहभागी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, क्षेत्रीय संघटन मंत्री निरव घेलाणींसह विद्यार्थी.

# राष्ट्रीय एकात्मतेमधून संस्कृतीचे दर्शन

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : ईशान्येकडील विद्यार्थ्यांशी संवाद

कोल्हापूर, ता. १६ : राष्ट्रीय एकात्मता यात्रेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात एकमेकांबद्दल जाणून घेताना देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये राष्ट्रीय एकात्मता यात्रा २०१८ च्या माध्यमातून आलेल्या भारतातील ईशान्य राज्यांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. त्याप्रसंगी विद्यार्थी विकास मंडळाने आयोजित 'विद्यार्थी संवाद' कार्यक्रमामध्ये प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के बोलत होते. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिर्के म्हणाले, ''प्रत्येक दिवशी आपण काहीतरी शिकत राहतोच. शिक्षण ही प्रगल्भता वाढीची प्रक्रिया आहे. विविध ठिकाणची निसर्ग संपदा, भौगोलिक प्रदेश, विविधतेतील लोकजीवन, बदलते तंत्रज्ञान, नवीन संशोधन याची माहिती प्राप्त करून घेताना देशाची एकात्मता विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अधिक दृढ होते. प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना पूर्वोत्तर क्षेत्रीय संघटन मंत्री निरव घेलाणी म्हणाले, या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध राज्यांमधील लोकजीवनाची अनुभूती मिळते. देशातील अन्य राज्यातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यासाठी ही यात्रा उपयुक्त आहे.''

अरुणाचल प्रदेश येथील विद्यार्थी बेन्जोंग आपल्या मनोगतामध्ये म्हणाले, अनेक वैशिष्ट्यांनी भरलेले हे विद्यापीठ अद्वितीय नैसर्गिक सौंदर्याने बहरलेले आहे. येथील लोकांमधील सकारात्मक ऊर्जा, लोकांचे प्रेम, स्नेह, आदरातिथ्य, संस्कृती, वातावरण, या आठवणी कायमस्वरूपी आमच्या स्मरणात राहतील. मेघालय येथील विद्यार्थिनी निशा पाल म्हणाल्या, विद्यापीठातील संगीत अधिविभाग, अद्ययावत विद्यापीठ ग्रंथालय, वनस्पतीशास्त्र अधिविभागामधील बोटोनिकल गार्डन हे पाहून विद्यापीठ आधुनिक तंत्रज्ञानासह किती निसर्गसंपन्न आहे, याची जाणीव आम्हा सर्वांना होते. यावेळी विद्यार्थ्यांना आंतरराज्य छात्र जीवन दर्शन माहितीपट दाखविण्यात आले. विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. कु. क्रांती शेवाळे यांनी आभार मानले. यावेळी भारतातील ईशान्य राज्यातून आलेले विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
17 JAN 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




राष्ट्रीय एकात्मता यात्रेची सांगता शाहू स्मारक भवनमध्ये मंगळवारी झाली. यावेळी पूर्वेकडील राज्यांतील विद्यार्थ्यांनी आपल्या कला-संस्कृतीचे दर्शन घडविले.

# कोल्हापूर हे आमचे घरच...

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

आंतरराज्य छात्र जीवन दर्शन यात्रेनिमित्त आम्ही अनेक राज्यांत गेलो. मात्र, कोल्हापुरात झालेल्या स्वागत आणि आदरातिथ्याने भारावलो असून कोल्हापूर हे आमचे घर असल्याचे मत आसाम येथील तरुणी हेबोजेल गामे हिने व्यक्त केले. शाहू स्मारक भवनमध्ये राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रमाच्या सांगता समारोपात ती बोलत होती.

यावेळी अभाविपचे प्रशांत साठे म्हणाले, 'राष्ट्रीय एकात्मता यात्रा ही विविधतेत एकता साधण्यासाठी आहे. सिल या उपक्रमाच्या माध्यमातून १९६५ पासून पूर्वेकडील राज्यांमध्ये एकात्मतेची भावना दृढ व्हावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. देशाचा सीमावर्ती भाग संवादाच्या माध्यमातून जोडत त्यांच्यात भारतीयत्वाची भावना निर्माण करणे हा मूळ उद्देश आहे. आजवर हजारो विद्यार्थ्यांना एकत्र करत या माध्यमातून कार्य चालू आहे. विद्यार्थ्यांत विविध कौशल्ये निर्माण करत त्यांचा आर्थिक आणि मानसिक विकास साधने असा व्यापक दृष्टीकोन आहे.'

**राष्ट्रीय एकात्मता यात्रेची सांगता**

### कृतज्ञता भेट

विदुर गेवाली या तरुणाने ज्या कुटुंबात वास्तव्य केले, त्यांना व्यासपीठावर बोलावत आपल्या डोक्यावरील टोपी काढत कृतज्ञता म्हणून ती त्यांना भेट दिली या प्रसंगाने उपस्थित भारावून गेले. त्याने 'जितना बडा कचोरी कोल्हापुरका, उतना बडा मन कोल्हापुरका' म्हणत कोल्हापूरकरांचे कौतुक केले.

या यात्रेत आसाम, सिक्कीम, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा आणि अरुणाचलप्रदेश या सात राज्यातील ३० तरुण-तरुणींनी सहभाग घेतला होता. देशातील वेगवेगळ्या भागात जात तेथील कुटुंबात वास्तव्य करत संस्कृती, खानपान, राहणीमान आदींची देवाणघेवाण करत विविधता समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. महालक्ष्मी मंदिर व परिसर, रंकाळा दर्शन व कोल्हापूरची ओळख, कणेरीमठ दर्शन, शाहू कारखाना व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची त्यांनी भेट घेतली. विविध महाविद्यालयांना भेटी देत शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमास उपस्थिती लावली.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथील सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रीयन संस्कृतीची ओळख दाखवणारी अनेक गीते आणि नृत्याविष्कार याचे सादरीकरण झाल देशभक्तीपर गीतांना तरुणांनी दिलेल्या 'भारतमाता की जय' या घोषणांनी सभागृह दणाणून सोडले. यावेळी विद्यानंद देवधर, नरेंद्र चांदसकर, जितेंद्र दत्त, हृषिकेश पांडे, क्रांती शेवाळे आदी उपस्थित होते.

17 JAN 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विजेमुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी दक्षता घ्या

## साजिदा मुल्ला

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विजेमुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येकाने दक्षता घ्यावी. यामुळे अपघाताचे प्रमाण शून्यावर येईल, असे प्रतिपादन विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आणि विद्युत निरीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या आयसीटी ट्रेनिंग सेंटरमध्ये आयोजित '११ ते १७ जानेवारी-विद्युत सुरक्षा सप्ताह' या कार्यक्रमात विद्युत निरीक्षक मुल्ला बोलत होत्या. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला म्हणाल्या, विजेमुळे मानवी जीवनात अभूतपूर्व क्रांती निर्माण झालेली आहे. यामुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी वीज आणि विजेची उपकरणे हाताळण्याबद्दल घरातील लहान-थोरांना माहिती द्यावी. विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्युत उपकरणे हाताळताना सुरक्षेच्या सर्व साधनांचा वापर करावा. विजेच्या दोऱ्यांवर कपडे वाळवू नयेत. विजेची उपकरणे नादुरुस्त झाल्यास घरच्या घरी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करू नये. घरातील विजेचे सॉकेट मुलांचा हात पोहोचणार नाही, इतक्या उंचीवर लावावेत. ठरावीक कालावधीनंतर वायरिंग बदलून घ्यावी. ओल्या हाताने विद्युत उपकरणांना स्पर्श करू नये. आयएसआय प्रमाणित उपकरणांचा वापर करावा. विजेमुळे वित्त व प्राणहानी टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी वेळीच घेणे आवश्यक आहे.

चित्रफितीद्वारे विद्युत निरीक्षक मुल्ला यांनी संभाव्य विद्युतहानी कशी टाळता येते याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये म्हणाले, माणसाचे जीवन अनमोल आहे. विद्युत उपकरणे हाताळताना अत्यंत दक्ष राहावे. त्याचबरोबर मोबाईल चार्जिंग करत असताना ते हाताळणे टाळावे. उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. विद्युत निरीक्षक आसमा बागवान, उपअभियंता (विद्युत) अमित कांबळे, कनिष्ठ अभियंता व विभागप्रमुख रणजित यादव, कनिष्ठ अभियंता (विद्युत) शिवकुमार ध्याडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 7 JAN 2018
सकाळ

# डॉ. देविकाराणी पाटील यांना पीएच.डी.



देविकाराणी पाटील

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातील संशोधन सहायक डॉ. देविकाराणी शिवाजीराव पाटील यांना पीएच.डी. जाहीर झाली. त्यांनी 'क्षात्रजगद्गुरू यांच्या सामाजिक-धार्मिक योगदानाचा ऐतिहासिक अभ्यास' विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. डॉ. पाटील यांनी क्षात्रजगद्गुरूंची भाषणे संकलित केली असून त्यांचा राजर्षी शाहू राजांची दुर्मीळ छायाचित्रे असणारा 'राजर्षी शाहू छत्रपती : रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र' ग्रंथ प्रकाशित झाला आहे. त्यांना प्राचार्य डॉ. आय. एच. पठाण, संशोधन शाहू केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2018
तरुण भारत

# स्टुडंट कौन्सिलसाठी महाविद्यालयीन यादी जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात येणार आहेत. महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकांसाठी वर्गप्रतिनिधींची मंगळवारी अंतिम यादी जाहीर करण्यात आली. बुधवार (१७) रोजी महाविद्यालय पातळीवरील सचिवपदाच्या अर्जांची अंतिम यादी जाहीर होणार आहे. तर दि. २४ रोजी महाविद्यालयीन पातळीवरील 'स्टुडंट कौन्सिल सचिवपदाची निवडणूक होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2018
सकाळ

# गोखले महाविद्यालयाचे एनएसएस शिबिर

कोल्हापूर, ता. १६ : गोखले महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले. शिवाजी विद्यापीठ परिसरातील प्राणिशास्त्र विभागासमोर, क्रीडा भवनासमोरील परिसरात स्वच्छता केली. प्रा. डॉ. सिद्धार्थ राक्षसे (राजकारणातील नैतिकता आणि विद्यार्थ्यांची भूमिका), प्रा. डॉ. अंजली साळवी (सामाजिक कार्य व विद्यार्थ्यांची भूमिका), प्रा. डॉ. कल्पना पाटोळे (स्त्री-पुरुष समानता), प्रा. राजश्री बिसुरे (बेटी बचाओ), प्रा. एम. के. पवार (सह्याद्रीच्या कुशीत हवा शिवरायांचा जन्म नवा) आदी विषयांवर व्याख्याने झाली. यात ६३ स्वयंसेवक सहभागी झाले. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, प्रशासन अधिकारी प्रा. मंजिरी मोरे, प्रा. पी. के. पाटील, प्र-प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, उपप्राचार्य एस. एस. गुरव यांचे मार्गदर्शन, सहकार्य लाभले. प्रकल्प अधिकारी प्रा. धनंजय कांबळे, सहा. प्रकल्प अधिकारी प्रा. आशिष बचाटे, प्रा. स्मिता गिरी, प्रा.एम. के. पवार यांनी संयोजन केले.